## प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ३१.०५.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) सौ.रुपाली दिनेश काळे, वय ३० वर्षे, पद – सरपंच मौजा बेसखेडा ग्राम पंचायत, रा.बेसखेडा पो.बोराळा ता.चांदुरबाजार जि. अमरावती (ईलोसे)<br>२)श्री.दिनेश देविदासराव काळे, वय ३९ वर्षे, व्यवसाय – शेती, रा. बेसखेडा पो.बोराळा ता.चांदुरबाजार जि.अमरावती (खाजगी व्यक्ती/सरपंच यांचे पती)<br>३)श्री.गजानन हरिशचंद्र महल्ले, वय ३८ वर्षे, व्यवसाय – मालवाहू गाडी चालक, रा. बेसखेडा पो.बोराळा ता.चांदुर बाजार जि.अमरावती (खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दि.२६/०५/२०२२ चे १५/२५ ते १६/२० वा. दरम्यान<br>दि.२७/०५/२०२२ चे ०९/५३ ते १०/१५ वा.दरम्यान |
| ४ | लाच मागणी रक्कम | कामाच्या रक्कमेच्या ०५ टक्के प्रमाणे एकुण १,००,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | सरपंच सौ.रुपाली काळे यांचे राहते घर ग्राम बेसखेडा ता.चांदुर बाजार जि.अमरावती. |

**थोडक्यात हकिकत :** यातील तक्रारदार यांना जिल्हा मृद व जलसंधारण कार्यालय अमरावती या कार्यालयाकडुन ग्रामपंचायत मौजा बेसखेडा ता.चांदुरबाजार जि.अमरावती येथील नाला रुंदीकरण व खोलीकरण करणाचे काम मिळाले असुन, सदरचे काम विनात्रास व काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता ग्रामपंचायत बेसखेडा च्या सरपंच सौ.रुपाली काळे यांनी त्यांचे पती दिनेश काळे व श्री. गजानन महल्ले यांचे मार्फतीने तक्रारदार यांना त्यांनी केलेले कामाच्या एकुण रकमेच्या ३ टक्के प्रमाणे ६०,०००/–रु.लाचेची मागणी करत असल्याबाबत दि.२६/०५/२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.२६/०५/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.१ दरम्यान सरपंच सौ.रुपाली काळे व त्यांचे पती श्री.दिनेश काळे यांनी तसेच दि.२७/०५/२०२२ रोजी पडताळणी कार्यवाही क्र.२ दरम्यान सरपंच यांचे पती श्री.दिनेश काळे व गजानन महल्ले यांनी जिल्हा मृद व जलसंधारण कार्यालय, अमरावती यांचेकडून मिळालेल्या मौजा बेसखेडा येथील नाला रुंदीकरण व खोलीकरणाचे काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता कामाच्या रक्कमेच्या ५ टक्के प्रमाणे १,००,०००/– रूपये लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.२७/०५/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र.२ व आरोपी क्र.३ यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवून बोलाविले. परंतु त्यांना संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. वरील नमुद आरोपीताना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द पो.स्टे.चांदुर बाजार, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, श्री.देवानंद घेवारे, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.संतोष इंगळे, पो.नि.सतीश उमरे, म.पो.हवा.माधुरी साबळे, पो.ना.युवराज राठोड, पो.ना.विनोद कुंजाम, निलेश महिंगे, चालक स.पो.उ.नि.सतिष किटूकले, पो.ना.नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,
टोल फ्रि नंबर – १०६४

(संतोष इंगळे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner